जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



❖ संस्थापक ❖

**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

६२ ऋतुराज सोसायटी, पुणे–सातारा रोड,
सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.
ऑफिस मो. : ८२६२०५६४८०
मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१
संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया
: सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ५७ वे ❖ अंक ११ वा ❖ जुलै २०२६ ❖ वीर संवत २५५२ ❖ विक्रम संवत २०८२

या अंकात | पान नं.

● ।। जिनेश्वरी ।।
अध्याय ८ : कपिल केवली ... १५
● अहंकार के ज़हर को त्यागे,
संयम के महत्त्व को समझे ... २१
● जैन म्हणजे फक्त गुजराती, मारवाडी
एक मोठा गैरसमज ... २५
● कव्हर तपशील ... २६
● जैनों की घटती आबादी : एक गंभीर संकट ... ३१
● धर्माच्या कॉलम मध्ये फक्त जैन लिहा ... ३८
● जैन हिन्दू आणि नरेटिव्ह ... ४१
● बहुत छोटी है हमारी सहयात्रा ... ४३
● डिजीटल संयम : आधुनिक जीवन की
आवश्यक साधना ... ४५
● श्री अमरसागर तीर्थ, जैसलमेर – राजस्थान ... ४७
● सफर करते समय एडजस्टमेंट,
तो परिवार में क्यों नहीं ... ४८
● बिन जाने कित जाऊँ – प्रश्नोत्तरी प्रवचन ... ५७
● नफरत V/s प्यार ... ५९
● वन मिनिट प्लीज ... ६०
● जैन चातुर्मास पर्व ... ६१
● जिनवाणीचे सार काव्यातून – अभ्यासिका ... ६३
● चातुर्मास के चार आयाम ... ६४
● वर्तमान में जो गया सम्भल
उसका होता हैं उज्ज्वल कल ... ६७
● न किसी से ईर्ष्या, न किसी से होड़ ... ६९
● आत्म जागृति से शांती की प्राप्ती ... ७१
● जीवन बोध : शांती की चाबी ... ७२
● जिंदगी शानदार है, जी भरकर जीएँ ... ७३
● हास्य जागृति ... ७४
● भारतीय जैन संघटना
परिवारीक अदालत ... ७९
● वधू–वर परिचय मेळावा, पुणे ... ८०

# जैन म्हणजे फक्त गुजराती मारवाडी एक मोठा गैरसमज

**लेखक : विठ्ठल साठे, पुणे. मो. : ९४२२३१२०५० (निमंत्रक, जैन विचार मंच)**

● 'जैन धर्माचे' नाव माहित नसलेला माणूस सापडणं कठीण (?) आहे. जैन धर्म भारतातील अतिशय प्राचीन धर्म आहे. हजारो वर्षाची परंपरा जैन धर्माला आहे. प्राचीनकाळी जैन धर्माला श्रमण परंपरा किंवा समण परंपरा या नावाने ओळखले जात होते. श्रमण परंपरा म्हणजे नेमके काय ? या विषयी वेगवेगळी मतं मांडली जातात. परंतु माझ्या मते श्रमण परंपरा म्हणजे श्रम करणारांची परंपरा.

● जैन परंपरेतील प्रथम तीर्थकर भगवान ऋषभनाथ यांच्या पासून ही परंपरा सुरु झाली. त्यांनी समाजाचे तीन विभाग केले. एक समाजाचे रक्षण करणारे, दोन-शेती किंवा व्यवसाय करणारे आणि तीन-कलाकुसर करणारे हे श्रम करणारे लोक होते. म्हणून त्यांना श्रमण म्हटलं जात होते. या श्रमणांनी सिंधू नदीच्या काठी अत्यंत श्रेष्ठ, सुंदर, चकित करणारी गसंस्कृती निर्माण केली. ती जगातील अतिप्राचीन संस्कृती होती. हे या विषयातील तज्ञांनी मान्य केले आहे. या संस्कृतीचा विकास सर्व क्षेत्रात झाला होता. कृषीपासून ते नगररचने पर्यंत आणि शिल्प कलेपासून ते संगीता पर्यंत. पर्यावरणा पासून ते तत्त्व ज्ञाना पर्यत सर्व म्हणजे सर्व क्षेत्रात प्रगती केली होती. आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी लोक भारताच्या सर्व भागात पोहोचले होते. भारतातच नव्हे तर भारताबाहेर सुद्धा प्रचार प्रसार झाला होता. म्हणूनच जगातील अनेक देशात जैन मंदिराचे अवशेष सापडले आहेत. जैन तीर्थकरांच्या मूर्त्या सापडल्या आहेत. थोडक्यात जैन धर्म हा भारतातील प्राचीन धर्म आहे आणि तो जगभर पसरलेला होता.

● वरील सर्व कथन करण्यामागील प्रयोजन हे आहे की, सांप्रतच्या काळात भारतात या धर्माची स्थिती खूपच वेगळी झाली आहे. एक तर भारतात जैनांची संख्या घटत चालली आहे. दुसरे म्हणजे जैन धर्म हा स्वतंत्र धर्म नसून तो हिंदू धर्माची एक शाखा आहे किंवा हिंदू धर्मातील एक पंथ आहे असे मानले जाते. भारतातील सर्वात प्राचीन धर्म असूनही जैन धर्म बौद्ध धर्माच्या नंतर अस्तित्वात आलेला धर्म आहे, असा गैरसमज झालेला आहे आणि हा समज प्रतिष्ठित विद्वनांचा आहे. इतिहासाचे अभ्यासक, तत्त्वज्ञानांचे अभ्यासक हेच मानतात. याच्यापेक्षा आश्चर्य कोणते? सम्राट चंद्रगुप्त जैन होता, सम्राट खारवेल जैन होता हे कुणी सांगत नाही खरं म्हणजे प्रस्थापित जैन सुद्धा या विषयावर फारसं बोलत नाहीत. त्यांना स्वारस्य नाही की त्यांना काही माहिती नाही यातले नेमके काय ते समजणे कठीण झाले आहे !

● आताची परिस्थिती अशी आहे की, जैन म्हणजे गुजराती किंवा मारवाडी लोकांचा असा समज झालेला आहे. जैन म्हणजे व्यापार करणारा वर्ग असे मानले जाते. 'पाटील, चव्हाण,' अशी आडनावे जैनां मध्ये आहेत हे ऐकून आश्चर्य व्यक्त केले जाते. महान कलाकार व्ही. शांताराम जैन होते हे बऱ्याच लोकांना माहीत नाही. व्ही. शांताराम यांनी आपल्या प्रत्येक चित्रपटातून अतिशय कौशल्याने 'जैन विचार' मांडला. हे फारसं अभ्यासले गेले नाही ही अत्यंत खेदजनक बाब आहे. इतकी उदासीनता का ते समजत नाही याचा अर्थ जैन समाज काहीच करत नाही असे नाही. सामाजिक जबाबदारी म्हणून हा समाज अनेक प्रकारचे

सामाजहितांचे कार्यक्रम आयोजित करीत असतो. दानधर्म मोठ्या प्रमाणात करतो हे ही तितकेच खरे आहे. पण....

● जैनांची ओळख पुसली जात आहे. सबंध जगभरात असलेला जैन म्हणजे फक्त दोन प्रांताच्या नावाने ओळखला जातो हे बरोबर नाही. हा गैरसमज दूर झाला पाहिजे. (अर्थात त्या दोन्ही प्रांतातील जैनांची स्तुतीच केली पाहिजे. निदान त्यांनी तरी जैन धर्म टिकून आहे. याची साक्ष उभी केली आहे.)

● सर्व जैनांनी आपली ओळख निर्माण करावी ही प्रामाणिक अपेक्षा !

जैन धर्म - प्राचीन, सार्वकालिक आणि सार्वभौम अहिंसा, अनेकांत, अपरिग्रह- हेच जैन धर्माचे सार !

जैन धर्म फक्त एका समाजाचा नाही, तर तो संपूर्ण मानवजातीचा आहे. ●


**ANIL KUCHERIA**
**Law Books Seller, Pune.**
**Mob: 9763645055**

**Available Books on**
- New Income Tax Act - 2026
- New Income Tax Rule - 2026
- Direct Tax Ready Reckoner - 2026

(And all books available on Capitalgain, HUF, Trust & NGO's, TDS & TCS, Appeal of Petition on IT. & GST, LLP, Search of Seazer's International Taxation, Custom & Foreign Trade Policy, MH.Co-op Society Act & other law's)

**Also Accepted Subscription & Advertise for**
☆ **Jain Jagruti - Magazine, Pune**
☆ **Vyapari Mitra - Magazine, Pune**


## कव्हर तपशील - जुलै २०२६




❖ **श्री अमर सागर तीर्थ – राजस्थान**
श्री अमर सागर तीर्थ, जैसलेमेर - राजस्थान या तीर्थाच्या माहितीचा लेख पान नं. ४७ वर दिला आहे.

❖ **भारतीय जैन संघटना**
भारतीय जैन संघटना द्वारा पुणे येथे जैन पारिवारीक अदालत संपन्न झाले.
(बातमी पान नं. ७९)

❖ **सकल जैन परिचय मेळावा, पुणे**
सकल जैन समाज 'परिचय ते परिणय' वधू-वर परिचय मेळावा आनंद दरबार, कात्रज येथे उत्साहात संपन्न झाला. (बातमी पान नं. ८०)

❖ **ऋषि आनंदवन, पुणे**
ऋषि आनंदवन, हडपसर, पुणे येथे ७ एकर जागेत भव्य वन उभारण्यात आले आहे. वन दिनानिमित्त वृक्षारोपन करण्यात आले. (बातमी पान नं. ८४)

❖ **सुर्यदत्ता ग्रुप, पुणे**
सुर्यदत्ता ग्रुप पुणे तर्फे एनएसईचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आशिष चौहान यांना सूर्यभारत ग्लोबल ॲवार्ड देण्यात आला.
(बातमी पान नं. ८५)

❖ **नवकार आर्ट फाऊंडेशन, पुणे**
नवकार आर्ट फाऊंडेशन पुणे तर्फे २०० चित्रकारांच्या चित्राचे प्रदर्शन ३१ मे २०२६ रोजी बालगंधर्व कलादालनात भरविण्यात आले होते.
(बातमी पान नं. ८२) ●